INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.71 (SJIF 2021)

# स्त्रीवाद : भारतीय आणि पाश्चात्य विचारसरणी

**मीरा दत्तू गायकवाड**
संशोधक
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद
E-mail: meera.gaikwad16@gmail.com

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/08.2021-67244362/IRJHIS2108010

**प्रस्तावना :**

भारत हा समृध्द ज्ञानाची परंपरा, ज्ञानीयाची मांदियाळी असलेला संपन्न देश आहे. जगाच्या अंतापर्यंत पुरेल एवढे समृध्द ज्ञान भारतीय साहित्य परंपरेत आढळते. वेद, उपनिषदे यात समाविष्ट असलेले ज्ञान मनुष्य व एकूण चराचर सृष्टीच्या प्रत्येक प्रश्नांची उकल करणारे आहे. रामायण—महाभारत यात मनुष्य समृध्द, सुखीसंपन्न जीवन केव्हा आणि कसे जगू शकतो? अषा बारीक—सारीक प्रश्नांची उकल करतात. श्रुती—पुराणे हे केवळ अंधश्रध्दा, कर्मकांड यासाठी नसून मनुष्य व त्याच्याशी संबंधित एकूण सजीव—निर्जीव सृष्टीचे आयुष्यमान केव्हा, कसे, कोणत्या आधारे जीवनमान व्यतित करू शकते याविषयीची सविस्तर मांडणी यात झालेली दिसते. आज विज्ञानाने होत असलेली प्रगती ही शास्त्राधारितच आहे. निसर्ग हे एक तत्व आहे. आणि त्यात समाविष्ट सजीव—निर्जीव हा त्याचा एक अविभाज्य भाग आहे. निसर्गाचा तत्वानुरूप संपूर्ण सृष्टी परिभ्रमण करत असते. निसर्गचक्र सुरू राहण्यासाठीच नर—मादी, स्त्री—पुरूष हे अविभाज्य अंग आहे. एकूण सजीव सृष्टीची वाढ—विकास होण्यासाठी नर—मादी, स्त्री—पुरूष हे कर्तव्यपुर्तीचे एक भाग ठरतात. मुलतः याच मुख्य उद्देशाने स्त्री—पुरूष हा भेद निसर्गाने निर्मिलेला आहे. आदिमानवाच्या कालखंडानंतर मानवाची भौतिक प्रगती जसजशी होत गेली तसतसे मानवातील हे भेद प्रकर्षाने उमटू लागले. इतर सजीवांमध्ये आजही नर—मादी हा भेद एकमेकांचे दमन करण्यासाठी उपयोगात आणला जात नाही. मानवाने मात्र जसजशी भौतिक प्रगती होत गेली. तसतसे स्त्रीयांचा शारीरिक कमकुवततेला अधिक प्रभावीपणे वापरून स्त्रियांना कमी लेखण्याचा फायदा घेतला. भारतीय इतिहासातील प्राचीन मध्ययुगीन कालीन स्त्रियांचा दर्जा कार्य, कर्तृत्व, स्त्रियांचा प्रश्न यांचा अभ्यास केला तर हे प्रामुख्याने लक्षात येते की, भारतीय समाजाने सदा—सर्वकाळी स्त्रियांच्या अधिकाराच्या कक्षा काहीशा सिमितच ठेवलेल्या आहेत. प्रगती स्त्रियांच्या

सहकार्याने झाली हे सर्वथा समाजाने नाकारले आणि स्त्री बंधनात जखडली गेली. सुरक्षितता, नीती—नियम, शुध्द चारित्र्याची बंधने यांच्या दबावाखाली 'स्त्री' येऊन प्रगतीपासून वंचित झाली केवळ 'चूल आणि मूल' या परीक्षेत्राशी बांधली गेली.

श्रुती—पुराणात शक्ती रूपात स्थान असलेली स्त्री, वेदउपनिषदांचे लेखन करणारी, प्राचीन—मध्ययुगीन कालखंडात जोखडात बांधली गेली, बौद्धीक तुरूंगात पकडली गेली. अगस्ती-ऋषींची पत्नी लोपमुद्रा त्यांच्या बरोबरीने ज्ञानदानाचे कार्य करीत होती. अनेकवेळा मैत्रयीनं वादविवादात सहभागी होऊन वादविवाद जिंकले मैत्रयी, गार्गी सारख्या विदुषींची परंपरा लाभलेला हा समाज पुढे मात्र स्त्री—शक्तीला सर्वत: नाकारता झाला. अनेक रूढी, प्रथा, परंपरा अशा निर्माण झाल्या की त्यातून स्त्रीचा दर्जा दुय्यम आहे हे दर्शविणाऱ्या होत्या.

''या देवी सर्व भूतेषु शक्ती रूपेण संस्थित।

नमस्त:स्यै, नमस्त:स्यै, नमस्त:स्यै नमो नम:।।

असा मंत्रोच्चार प्रकट झालेला आहे. भारतीय तत्वज्ञानात स्त्रीचे अस्तित्व अबला नसुन 'सबला' आहे. भारतीय तत्वज्ञान हे सृष्टीला ब्रम्ह आणि मायेचे प्रतिरूप मानते. ब्रम्ह हे निर्गूण, निराकार, निर्विकार असे एक अस्तित्व आहे तर 'माया' ही त्याला प्रकट करणारी एक शक्ती आहे. माया ही ब्रम्हापासून अलग राहूच शकत नाही. 'माया' ही गुणमयी आहे. सत्व—रज—तम या त्रिगुणातून प्रकट होणे हे मायेची रूप आहे. ब्रम्ह निर्वीकार आहे परंतु माया ब्रम्हाला विकार निर्मान करते. व त्यातून विश्वसृजन होते. ब्रम्ह आणि माया हे अभिन्न आहेत. फक्त कार्यावरूनच मायेचे लक्षण सांगता येते.

संत ज्ञानदेव अमृतानुभवात सांगतात, ''स्त्री—पुरूष नामभेदे। शिवपण एकले न दे।।" (अमृ—१—१७) स्त्रीत्व आणि पुरूषत्व हे केवळ नामरूपाचे विकार आहेत चैतन्यतत्व हे एकच आहे, ही विश्वचैतन्यवादी भूमिका ज्ञानदेवांची आहे.

**स्त्रीवाद :**

भारतीय स्त्री जीवनाचा नेमका आलेख काढताना चार कालखंड पाडता येतील.

१) प्राचीन कालखंड — प्रारंभ ते बारावे शतक

२) मध्ययुगीन कालखंड — तेरावे ते सोळावे शतक

३) आधुनिक कालखंड — सतरावे ते एकोणीसावे शतक

४) अत्याधुनिक कालखंड — विसाव्या शतकापासून पुढे

अशाप्रकारे या कालखंडाचा स्त्रीवादाच्या दृष्टीकोनातून अभ्यास करताना स्त्री—जीवनाभुतीचे स्वरूप कसे होते ते समजून घेणे हा हेतू मुख्य मानावा लागतो.

समाजव्यवस्थेने स्त्रियांना कोणत्या प्रकारचे साचेबंद जीवन देऊ केले होते आणि ते जगताना स्त्रिया

कोणकोणत्या गुणविशेषांचे प्रदर्शन करतात हे लक्षात घ्यावे लागते.

प्रामुख्यांने पुरूषप्रधान संस्कृतीचा उद्‌य कसा झाला हे पहावे लागते. विवाहसंस्थेशी निगडीत कोणते जीवन स्त्रीच्या वाट्यास आले दृश्य स्वरूपीत होते.

वेदपूर्वकालीन परिस्थिती वेगळी होती. स्त्री—पुरूषाना समान प्रशिक्षण होते. स्त्री—पुरूष हा भेद ना देहाधारित होता, ना बौध्दिक, मानसिक स्तरावर होता. स्त्रिया स्वतःचे गुरूकूल चालवत होत्या. स्त्रियांनी ऋचा लिहिल्या, सैनिक प्रशिक्षणही घेतले होते. प्रत्यक्ष युध्दात स्त्रियांनी सहभाग नोंदविला. रंणागणावर स्त्री हत्या करणे हे काही पातक समजले जात नव्हते. शिक्षणक्षेत्रातही सद्योद्वाहा व ब्रम्हवादिनी अशा संज्ञा सन्मानपुर्वक स्त्रियांना दिल्या गेलेल्या होत्या. विवाहापर्यंत शिक्षण घेणाऱ्या स्त्रीस सद्योद्वाहा व अविवाहित राहूनही अखंड ज्ञानोपासना करणाऱ्या स्त्रीस ब्रम्हवादीनी म्हटले जाई. विवाहाची घाई नसायची, मुलीचं लग्न प्रौढवयात केले जाई, योनिशुचित्वाच्या संकल्पना नव्हत्या. शरीरशुचित्वाहून वंशसातत्य अथवा अपत्यजन्म हा घटक केंद्रवर्ती होता. विधवा स्त्रियासांठी नियोग पध्दतीने गर्भधारणाची पध्दती होती व सौभाग्यवतीसाठीही होती. स्त्रियांना शिक्षक, वादविवादपटू, तत्वज्ञ असे अस्तित्व प्राप्त होते, होऊ शकत असे. यज्ञावेळी श्रेष्ठ ऋषिचे स्मरण करताना श्रेष्ठ ऋषिस्त्रियांचेही स्मरण केले जाई. उच्च जातीमध्ये मुलांबरोबर मुलींचेही उपनयन केले जाई. विवाह संस्थेअंतर्गत पती—पत्नीच्या नात्यात हृदयमिलनाला अधिक महत्व होते. कुटुंबाची सत्ता पुरूषप्रधान असली तरी स्त्रियांना गौण स्थान नव्हते. आज समाजात असलेली स्त्री—भ्रुणहत्येइतकी कटु भावना मुलींबाबत त्याकाळी अजिबातच नव्हती.

स्त्री जीवनात जे खटकणारे बदल घडले ते ऋगवेद काळापासून ते ख्रिस्तीशतक बाराशे (१२००) पर्यंतच्या दोन अडीच हजार वर्षात. ‘ब्राम्हण जातीत आठव्या वर्षी मुला मुलींचे जे वेदाध्ययन सुरू होई त्यात खंड पडला.

- ❖ शारिरीक पावित्र्यासंबधीचे संकेत निर्माण झाले यातून बालविवाहाची पध्दत सुरू झाली.
- ❖ स्त्रीचे पुरूषपरावलंबित्व वाढले.
- ❖ मुलींचे अध्ययन तर बंदच झाले.
- ❖ संन्यस्त महंताच्या वाटेवरचा अडथळा म्हणून स्त्रियांकडे पाहण्यात येऊ लागले. प्रतिमा पुणर्तः डागाळून गेली.
- ❖ शिक्षण बंद झाल्यामुळे स्त्रियांचा आत्मविश्वास खचत गेला. स्त्रिया भित्र्या होत गेल्या परंतु तरीही कमी संख्येने असले तरी दैदिप्यमान असे स्त्री तेजाचे दाखले भारतीय वाटचालीत सापडतात.

अनेक समाजात स्त्रिया शारीरिक कष्टाची कामे करत आल्या आहेत. आणि करत आहेत. पण घर ही त्यांची सर्वप्रथम जबाबदारी मानल्याने सामाजिक जीवनात पुर्णतः भागीदारी नाकारली जाते. राजकीय नेतृत्व, कलाविषयक कामगिरी, शास्त्रीय शोध, उत्पादक निर्मितीक्षमता हयाबाबतीत त्यांना संपूर्णतः स्वीकारून जबाबदारी मिळत नाही. जीवशास्त्रीय मर्यादांचा बाऊ केला जातो.

१८ वे शतक म्हणजे उत्तर पेशवाईचा काळ या काळात स्त्री जीवन अधिक खडतर होते. पेशव्यांचा आणि

पुरूषप्रधान संस्कृतीचा स्त्रीयांवर अधीक वचक होता. १८१८ मध्ये पुढे पेशवाई बुडाली. इंग्रजी सत्तेचा अंमल सुरू झाला. पेशवाईचा वचक कमी झाला. अशा परिस्थीतीत परिवर्तनाची एक लाट आली. म्हणून १९ वे शतक हे परिवर्तनाचे शतक मानले गेले. ही परिवर्तनाची नांदी पुढे २० व्या शतकात सुरू राहीली.

समाज परिवर्तन, वैचारिक प्रबोधन, आर्थिक स्वातंत्र्य, शिक्षणाचा प्रसार, स्त्री शिक्षणाचा प्रारंभ एकूणच या काळात परिवर्तनाच्या लाटेने भारतीय सांस्कृतिक जीवनात अनेक उलथापालथी घडून आल्या. याच काळात स्त्रीजीवनाकडे नवीन दृष्टीकोन निर्माण झाला. स्त्रियांनाही आत्मप्रतिष्ठेची जाणीव होऊ लागली. जीवनाकडे नातेसंबधाकडे बघण्याची नवीन दृष्टी येऊ लागली.

स्त्रीवाद म्हणजे स्त्रीला आपल्या सत्वाची जाणीव होणे तिला स्वत:चे हक्क आणि अधिकार कळणे, शोषणाची जाणीव होणे, अवमुल्यनाची जाणीव होणे, स्वत्वासाठी संघर्षप्रवण होणे अशी सर्वसाधारण स्त्रीवादाची भूमिका मांडण्यात येते.

स्त्रीच्या माणूसपणाचा विचार हे स्त्रीवादी विचारसरणीचे केंद्रस्थान आहे. स्त्री ही प्रथम माणूस, मानव म्हणून जन्माला येते परंतु ज्या समाजात ती जन्म घेते तो समाज केवळ 'मादी' म्हणून तिच्याकडे पाहतो. 'मादी', 'बाई' या चौकटीत घट्ट जखडून तिच्यावर बाईपणाचा शिक्का मारला जातो.

१९७५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून साजरे केले गेले. त्यातूनच स्त्रीच्या ठायी अमोघ शक्ती आहे, तिच्या सुप्त शक्तीला समाजोन्नतीतील शोषक असे गुण स्त्रीच्या ठायी आहेत. त्यांचा विकास झाला पाहिजे असा विचार पुढे आला. आधुनिक पाश्चात्य स्त्रीवादी विचारांचा आणि चळवळीचा भारतीय स्त्रीयांना परिचय झाला. त्यावेळापर्यंत भारतात 'स्त्रीवाद' हा शब्द फारसा प्रचलित नव्हता. 'स्त्रीमुक्ती' चळवळ असाच शब्द परिचित होता.

१७८९ फ्रेंच राज्यक्रांतीमधून स्त्रीमुक्तीच्या विचारांना निश्चित दिशा लाभली. १७९० फ्रान्समध्ये 'ऑलिंप द गुंझ' या लेखिकेने स्त्रीला स्त्रियांच्या हक्काचा जाहिरनामा प्रकाशित करून पुरूषाप्रमाणेच स्वतंत्र व्यक्ती म्हणून स्थान मिळावे ही मागणी अग्रक्रमाने पुढे रेटली. यातुन स्फुर्ती घेऊन इंग्लंडमध्येही स्त्रियांच्या उपेक्षित, दडपलेल्या स्थितीत सुधारणा होण्यासाठी 'मेरी बुलस्टोन' फ्रान्सच्या नेतृत्वाखाली १७९२ मध्ये स्त्रियांच्या हक्कासाठी शैक्षणिक सोयी, राजकीय हक्क यासाठी चळवळीचा पाया रोवला गेला. स्त्रियांच्या प्रश्नाविषयी जागरूक असणाऱ्या 'क्लास झेटकीन' या जर्मन महिलेने ८ मार्च हा दिवस जगभर 'स्त्रीमुक्तीदिन' म्हणून पाळण्याचे आवाहन केले.

**पाश्चात्य स्त्रीवाद :**

पाश्चात्य स्त्रीवादामागे तेथील पुर्वसुरींच्या विचारांची बैठक आहे. 'मेरी बुलस्टोन क्रॉफ्ट' हिचे The Vidication of Right of woman (१९९२) 'जॉन स्टुअर्ट मिल' चे The Subjection woman (१८६९) 'व्हर्जिनिया वुल्फ' चे A Room of One's Own (१९२९) आणि 'सिमान द बोव्हान' यांचे The Second Sex (१९४९) या ग्रंथामधील लेखन हे पाश्चात्य स्त्रीवादी चळवळीस व स्त्रीवादी विचारांना चालना देणारे ठरले.

**मेरी बुलस्टोन क्रॉफ्ट** : मानवी हक्काचे बील (१७८९) व बिल ऑफ राईट्स यामध्ये सर्व मानवांना हक्क आहेत आणि स्त्रियांना मात्र नाहीत हे पाहून मेरी बुलस्टोनने आवाज उठविला त्यांनी ग्रंथात विचारले आहे की, 'स्त्री ही मानव नाही का?' १९७२ मध्ये मांडलेले हे विचार स्त्रीवादी विचारांचा आरंभच म्हणावा लागेल.

**जॉन स्टुअर्ट मिल** : The subjection woman या ग्रंथात म्हणतात की, ''पुरूषांना जर मतदानाचा हक्क असेल तर स्त्रियांना तो कोणत्या कारणामुळे नाकारण्यात आला आहे? स्त्रीवादाला पुरक अशीच विचारसरणी या ग्रंथात स्पष्ट केली आहे.

**व्हर्जिनिया वुल्फ** : Room of One's Own या पुस्तकातुन स्त्रीयांना अभिव्यक्तीसाठी, स्वातंत्र्यासाठी स्वतःची रूम, स्वतंत्रपणे स्वास्थ देणारे ठिकाण पाहिजे जेणेकरून स्त्रिंया स्वतंत्रपणे विचार करून स्वतःचा विकास साधू शकतील. हे विचार स्त्रीवादी चळवळीने उचलून धरले.

**सिमॉन द बोव्हान** : Second Sex या पुस्तकातुन पुरूषप्रधान संस्कृतीवर सडेतोड फटकारे मारीत स्त्रीत्वाच्या गौणत्वाला वाचा फोडली. या पुस्तकात त्या स्पष्टपणे म्हणतात, 'कोणीही बाई म्हणून जन्माला येत नाही बाई तिला बनविले जाते' केवळ लिंग भेदातून एखादया व्यक्तीवर बाईपणाच्या कल्पना लादल्या गेल्या त्यामुळे स्त्री ही लैंगिक अत्याचाराची बळी ठरत गेली. लैंगिक अत्याचाराच्या विरोधात स्त्रीवादाने व स्त्रीवादी चळवळीने पाऊल टाकले.

या वरील सर्व विचारवंताचा विचार परामर्श घेता पाश्चात्य स्त्रीवादी सिध्दांत ही पुरूषप्रधान व्यवस्थेतील स्त्री शोषणाची जाणीव करून देणारे आहेत असे दिसते.

**भारतीय स्त्रीवाद** :

भारतीय स्त्री व्यक्तीवादी समाजातील स्त्री–प्रमाणे सुटे अस्तित्व असणारी नाही. ती जन्मापासुनच विविध भूमिकांमध्ये जगत असते या भूमिकांमध्ये ती पुरूषाशी भावनिक पातळीवर जोडलेली असते. भारतीय स्त्रीचा विचार म्हणजे तिच्याशी संबंधित असणाऱ्या प्रत्येक घटकाचाही विचार होय. सगळयांना सामावून घेण्याच्या अनुभव विश्वातून भारतीय स्त्री निर्माण झालेली सत्वे स्वतःबरोबरच इतर घटकानांही बळ पुरविण्याची क्षमता राखतात. भारतीय समाजाने स्त्रियांना शक्तीचे प्रतिरूप मानलेले आहे. त्यामुळे प्रस्थापित संकेतापैकी सर्वच संकेत उधळून न लावता त्यांची चिकित्सक छाननी करून दडपशाही अस्तित्वात आणणारे संकेत वेचून मिटविण्याचे उद्दिष्टे भारतीय स्त्रीवादापुढे आहेत. स्त्रीमध्ये असणाऱ्या प्रवृत्ती हया तिच्या दुबळेपणाची प्रतिके नसून त्यातील वेचक प्रवृत्ती उलट तिचे बळ म्हणून प्रस्थापित करण्याचा प्रयत्न वादाअंतर्गत महत्वाचा आहे.

प्रथम स्त्रीवादी भूमिकेच्या बाबतीत विश्वकोशकार लिहतात 'स्त्रीवाद' ही केवळ सैद्धांतिक विचार प्रणाली नसून गतीशील आणि कृतीशील स्वरूपाची आहे. युगानुयुगांपासून आजतागयात स्त्रीवर होत असलेल्या अत्याचाराची कारणे समजून घेऊन ते जुलूम समूळ नष्ट करण्यासाठी प्रयत्न करणे हे या विचारप्रणालीचे मुख्य उद्दिष्टये होय.

भारतीय स्त्रीवादी चळवळीची वाटचाल पाश्चात्य स्त्रीवादी चळवळीपेक्षा वेगळया वाटचालीने झाली आहे.

भारतीय स्त्रियांवर होणारा अत्याचार हा वर्षानुवर्षापासून दृढ होत गेलेल्या परंपरामुळे स्त्रीकडून स्त्रीवर होणारा अन्याय होता. रूढी परपंराच्या जखडात स्त्री मानसिकता इतकी भरडून गेली होती की आपण अत्याचारग्रस्त आहोत हे समजण्याइतपत बुध्दी काम करत नव्हती. भारतीय स्त्री चळवळीला पुरूष सुधारकांचे बहुमोल योगदान आहे.

अमेरिकन स्त्रीवादाचा प्रभाव जगातील इतर स्त्रीवादी चळवळीवर पडलेला दिसून येतो अमेरिकन स्त्रीवाद स्त्रीमुक्ती चळवळ यापेक्षा भारतीय स्त्री चळवळीचे स्वरूप खूपच वेगळे आहे.

**शोभा नाईक —** प्रारंभी स्त्रीवाद म्हणजे बिनलग्नाचे राहून स्वैराचाराला मुभा ठेवणे, कंचुकी शाळा अशा मोहिमांना प्रोत्साहन अशी एक समजूत होती. परंतु आता स्त्रीवादाचे गांभीर्य व व्यापकता लक्षात घेऊन प्रारंभीचा धुराळा आज निमाळा आहे.

मतमतांतून स्त्रीवादासंबंधी खालील गोष्टी स्पष्ट होतात.

❖ स्त्रीवाद म्हणजे स्त्री–पुरूष समानतेचे, स्त्री–पुरूष दोघानांही समानप्रतिष्ठा, समान वागणूक, समान संधी देणारे माणुसपणाचे तत्वज्ञान होय.

❖ स्त्रीवाद स्त्रीमुक्ती म्हणजे पुरूषापासून मुक्ती म्हणजे पुरूषानुकरण म्हणजे कुटुंब नाकारणे, मर्यादा सोडलेला बेताल वर्तनाचा भाग नव्हे.

❖ स्त्रीवाद हा कुटुंबजीवन हा नाकारणारा, घर उध्दवस्त करणारा नक्कीच नाही.

**सुमती लांडे व श्रुती तांबे**— यांच्या स्त्रीवादी विचारांचा मागोवा घेताना असे दिसते की, लिंगभेदावर आधारलेली श्रमविभागणी पूर्णपणे नष्ट करणे हा स्त्रीमुक्तीचा खरा अर्थ आहे.

वरील विचारात दोन महत्वाच्या बाजू आहेत त्या म्हणजे उत्पादन आणि राजकीय जीवन या क्षेत्रात स्त्रीचा संपूर्ण प्रवेश गृहकृत्य वशिशुसंगोपन (चूल आणि मूल) या पारंपारिक ओझ्यापासून स्त्रीची संपुर्ण मुक्तता झाली पाहिजे. घरकामाचे यांत्रिकीकरण झाले पाहिजे, घरकामात पुरूषानीही सहभागी झाले पाहिजे. हे काम स्त्रीयांचे आहे, हे काम पुरूषाचे नाही या पारंपारिक समजूती दूर व्हायला हव्यात.

या विचारातुन श्रमविभागणीत लिंगभेद टाळणे हे स्त्रीमुक्तीचे पहिले पाऊल असून स्त्री–पुरूष समानता हा त्याचा आत्मा आहे.

स्त्रीवादाची संकल्पना स्पष्ट करताना शारदा साठे म्हणतात ''स्त्रीवाद म्हणजे स्त्री–पुरूष समानतेचा अविष्कार घडविण्यासाठी मार्गदर्शन करणारे किंबहुना मदतकारक ठरणारे एक सुसूत्र विचारसूत्र आहे.''

सीमा साखरे म्हणतात– ''स्त्रियांवरील अत्याचार आणि पुरूष प्रधानतेतून निर्माण झालेल्या समस्यांना उत्तर देण्यासाठी स्त्रीवादी विचार अस्तित्वात आला.''

शेवटी स्त्रीवाद म्हणजे स्त्रियांच्या शोषणाबद्दल, अत्याचाराबद्दल समाजात, कुटुंबात कायमची जाणीव जागृती निर्माण करणे आणि ही परिस्थिती बदलण्यासाठी स्त्री–पुरूषांनी जाणीवपूर्वक विचार आणि कृती करणे

म्हणजे स्त्रीवाद होय. अर्थोउत्पादनासाठी स्त्रियांनी विविध क्षेत्रे अंगीकारली आहेत. परंतु स्त्री म्हणून त्यांचे शोषण होते ती परीस्थिती बदलावी अशी भूमिका स्त्रीवादी सांगतात.

स्त्रीवादाबाबत अश्विनी धोंगडे लिहतात, ''स्त्रीवाद म्हणजे पुरूषांपासून फारकत घेऊन स्वत:चा सवता सुभा निर्माण करणे नव्हे. परंतू संस्कृतीच्या हजारो वर्षाच्या इतिहासाने बाईचे मानवपण नाकारून तिला जी पशूतुल्य अवस्था प्राप्त करून दिली आहे. त्यातुन बाहेर पडून आपले हक्क प्रस्थापित करून घेण्यासाठी निर्माण केलेले व्यासपीठ आहे. ज्यावेळी स्त्री ही खुलेपणाने श्वास घेऊन पुरूषांइतकेच स्वतंत्र जीवन जगू शकेल, त्यावेळी स्त्रीवादाची गरज भासणार नाही.''

पुरूषाकडे पाहताना जसे फक्त कर्तृत्वाच्या भूमिकेतुन/दृष्टिकोनातून पाहिले जाते तसे जेव्हा 'स्त्री' ही केवळ शारीरिक नाही तर कर्तृत्वाच्या नजरेतून पाहिले जाईल तेव्हाच 'स्त्री' मोकळा श्वास घेऊ शकेल. हा श्वास मोकळा घेण्यासाठीची लढाई जिंकण्याला हजारोवर्ष पूढे जावे लागेल.

आज समाजाने तांत्रिक प्रगती केली आहे आणि बहुतांश उपयोगातही आणली जाऊ लागली या तांत्रिक प्रगतीने देखील 'स्त्री' ला मुक्त केले नाही. कुंटुबाची दैनंदिनी आणखी व्यस्त झाली, तांत्रिक प्रगतीने स्त्रियांची घरकामाची, गृहकृत्य दक्षतेची संसारीक जबाबदारी तसूभरही कमी झाली नाही. मनुष्य प्रगती करताना भौतिक दृष्टया दिसत असला तरी मानसिक आणि सामाजिक गुलामगिरी अद्यापही तीच आहे. तंत्रयुगाने केवळ माणसाची कपडे परीधान करण्याची पध्दत बदलली, धोतर जाऊन पॅन्ट आली, सदरा जाऊन टी–शर्ट आला, लुगडी–साडीची जागा ड्रेसने घेतली परंतु बाहयदृष्टीने सुधारीत दिसणारी ही वेशभूषा मनाच्या गुलामगिरीची जोखड तोडू शकलेली नाहीत. आधुनिक राहणीमान मानसिक गुलामगिरीची साखळी अधिक घटट आवळू लागली.

**स्त्रीवाद/स्त्रीमुक्ती चळवळ यांची भुमिका :**

- ❖ स्त्री–पुरूष संबधातून योनिशूचितेचे अवास्तव महत्व निघून गेले पाहिजे.
- ❖ स्त्री ही माणुस आहे लक्षात घेऊन तिचे होणारी शारीरिक मानसिक पिळवणूक थांबली पाहिजे.
- ❖ समता–स्वांतत्र परस्पर प्रेमभाव यातून स्त्री–पुरूषाचे नाते संबंध दृढ व्हायला पाहिजे.
- ❖ समाजातील स्त्रीयांचे दुय्यमत्व नष्ट व्हायला पाहिजे.
- ❖ श्रमविभागणी लिंगभेदाधारीत न राहता ती समान तत्वावर झाली पाहिजे.
- ❖ घरकामात स्त्रियांबरोबर पुरूषांनीही समान वाटा उचलला पाहिजे.
- ❖ हे काम पुरूषाचे–हे काम स्त्रियांचे असा भेद कामाच्या बाबतीत होता कामा नये.
- ❖ आर्थिक व्यवहारात, वैधानिक, कायदेशिर हक्क, समान संधी, समान स्थान, स्वनिर्णयाचे अधिकार केवळ कागदावर न देता प्रत्यक्ष समाजव्यवस्थेत अंमलात यायला हवेत.
- ❖ मालमत्तेच्या बाबतीत निर्णय घेण्याचा अधिकार समाजाने स्वीकारला पाहिजे.

❖ स्त्रियांच्या स्वत:च्या शरीरावर स्वत:चा अधिकार असला पाहिजे.

❖ धर्मानी स्त्रीयांना नाकारलेले हक्क पुरूषांच्या बरोबराने मिळायला हवेत. उदा. पौराहित्य करणे, दशक्रिया विधी करणे, मंदिराच्या गाभाऱ्यात प्रवेश.

❖ स्त्रीची सनातन व दुबळी प्रतिमा पुसली गेली पाहिजे.

**स्त्रीवादाची आधुनिक वाटचाल :**

स्त्रियांना दुय्यमत्व देण्यामागे जे पुरूषी राजकारण आहे त्याचा बीमोड करणे हे स्त्रीवादाचे मूळ उद्दिष्ट आहे. स्वविकास स्वातंत्रता स्त्रीवादाचे मुख्य कार्य करणे आहे. स्वत्वाची ओळख, स्वायतत्ता, स्वयंनिर्णय, सक्रिय सहभाग या गोष्टी स्त्रीला परिपक्व बनवतात. आपल्या सांकाल्पनिक, सैद्धांतिक चौकटीमध्ये मिळणारे गौणत्व, त्यांचे केले जाणारे दमन याचे स्पष्टीकरण त्यामागील कारणांचे विश्लेषन स्त्रीवाद करतो. त्याचप्रमाणे सामाजिक वास्तव बदलण्यासाठी काय करावे याचे विवेचनही स्त्रीवाद करतो. काळानुसार स्त्रीवादी चळवळीत जहाल—मवाळ, मार्क्सवादी, पर्यावरणवादी, कृष्णवर्णीय अशा विविध छटा असलेल्या अनेक विचारसरणीच्या स्त्रीवादी चळवळी एकत्र काम करताना दिसतात.

स्त्रीवादाच्या निरनिराळया सिद्धांतामधून आणि परस्पर संबंधामधून जो विकास घडला त्यामध्ये स्त्रीच्या गौणत्वाला कारणीभूत ठरणाऱ्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय, मानसशास्त्रीय घटकांचा सखोल अभ्यास करण्यात आला स्त्रीत्वाची काही सार्वत्रिक, सार्वकालीक व्याख्या करणे शक्य आहे काय? याचाही विचार करण्यात आला स्त्रीत्व हे निसर्गदत्त असते म्हणून अपरिवर्तनीय असते की ते एक सामाजिक रचना असते म्हणून परिवर्तनशील असते. स्त्रीवादाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे मुलभूत प्रश्नही उपस्थित करण्यात आले. स्त्रीमुक्तीचा लढा हा शोषित—वंचिताच्या लढयापासून वेगळा काढता येत नाही, याचे एक सूजाणभान सर्व चर्चामधून निघते.

एकुण पाश्चात्य स्त्रीवादाच्या विचारसरणीत स्त्रीच्या व्यक्तित्वाचा मानसन्मान सर्व प्रकारची स्वातंत्रे आणि समानता यावर भर देण्यात आला. तथापि भारतात स्त्री—विरूध्द पुरूष अशी भावना भारतीय संस्कृतीत कधीच नव्हती. कुटूंबसंस्थेला भारतीय संस्कृतीत अन्ययसाधारण महत्व असल्याने विविध नातेसंबंधातून (पत्नी, आई, काकू, आत्या, मामी, आजी, मावशी) स्त्रीविकासाचे मार्ग खूले झालेले दिसतात. व्यक्तिस्वातंत्र्यापेक्षा व्यापक समाजहितासाठी त्याग करण्याची परंपरा भारतात असल्याने स्त्रीवादाची भूमिका भारतीय परिप्रेक्ष्यात पाश्चात्यांच्या विचारांपेक्षा वेगळी करण्याची गरज भासते. तरी अंतिमत: स्त्रीवादाचा साकल्याने विचार केल्यास स्त्री—स्वातंत्र्य, स्त्री—पुरूष समानता व आत्मनिर्भरता या गोष्टी स्त्री उद्धारासाठी अपरिहार्य ठरतात.

**संदर्भ :**

१) नाईक शोभा, भारतीय संदर्भातून स्त्रीवाद (स्त्रीवादी समीक्षा आणि उपयोजन), लोकवाङमयगृह, मुंबई जून २००७

२) डॉ. पाटील लीला, भारती स्त्री जीवन, मेहता पब्लिकेशन, पुणे, १९९०

३) सुमती लांडे, श्रुती तांबे, स्त्रीवाद, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, ५ डिसे. २००७

४) डॉ. वंदना महाजन, स्त्रीवाद आणि समाजपरिवर्तन, अथर्व पब्लिकेशन्स, धूळे, २७ फेब्रुवारी २०१३

५) डॉ. लिला दिक्षित, डॉ. अरुणा ढेरे, विनया खडपेकर, स्त्री साहित्याचा मागोवा खंड – १,२,३

६) डॉ. सदाशिव सरकटे, स्त्रीवादी भूमिका व काव्य – स्त्रीकोष

७) Vikaspedia on Google – स्त्रीवाद